DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02472-227301

फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41, व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 21.03.2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 22.03.2020.
6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 24.03.2020.
7. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(a) दि. 24.03.2020.
8. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 25.03.2020.
9. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 25.03.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 27/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संदर्भ क्र. 4 चे आदेशान्वये उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये आदेश पारित केला आहे. तसेच संदर्भ क्र. 5 चे आदेशान्वये लॉकडाऊनचा आदेश पारित केला आहे व संदर्भ क्र. 7 नुसार भारत सरकारकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार दि. 14 एप्रिल 2020 पर्यंत लॉकडाऊन सुरु ठेवणेबाबत संदर्भ क्र. 6 चे आदेशान्वये आदेशित केले आहे.

ज्याअर्थी लॉकडाऊनची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे अनुषंगाने संदर्भ क्र. 8 नुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील डिझेल/पेट्रोलपंप सकाळी 10.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत चालू ठेवण्यास परवानगी दिलेली आहे. ज्याअर्थी नागरिकांना लॉकडाऊनचे पालन करणेबाबत तसेच अत्यावश्यक कामांव्यतिरिक्त घराबाहेर न पडण्याचे वारंवार आवाहन केलेले असूनही रस्त्यावर अनावश्यक वाहने फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे. ज्याअर्थी लॉकडाऊनची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी रस्त्यावरील अनावश्यक वाहतुकीवर नियंत्रण आणणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार, करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व डिझेल/पेट्रोल पंपावर **शासकीय/आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात काम करणा-या अधिकारी/कर्मचा-यांची वाहने, अत्यावश्यक सेवा देणारी वाहने, आरोग्यविषयक सेवा देणारी वाहने उदा. ॲम्ब्युलन्स इ. वाहने वगळता** पेट्रोल/डिझेल पंपावर **गर्दी करणा-या, वारंवार येणा-या व अनावश्यक मागणी करणा-या वाहनधारकांचे वाहनांमध्ये पेट्रोल/डिझेल भरण्यात येऊ नये** असे आदेशित करीत आहे.

या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी **तालुका दंडाधिकारी तथा INCIDENT COMMANDER यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील पेट्रोल/डिझेल पंपावर गर्दी होणार नाही या संदर्भात योग्य नियमन करावे व वाहनांमध्ये वारंवार पेट्रोल/डिझेलची मागणी करणा-या व्यक्तींची मागणी रास्त असल्याबाबत खात्री करुन संबंधितांना आवश्यकतेनुसार पासेस/टोकन वाटप करण्याबाबत** उचित कार्यवाही करावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 3 मधील तरतुदींनुसार तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दि. 14 एप्रिल 2020 चे मध्यरात्रीपर्यंत आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. अध्यक्ष, इंडियन मेडीकल असोसिएशन, शाखा उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
8. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
10. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
13. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

27/3/20
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner